## उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२, दिनांक:-११ मार्च, २०१६

## *अधिसूचना*

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५.**

क्रमांक.टीईएम-२०१५ / सीआर ५३६ / टीई - ४ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ ) च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याव्दारे प्रथम वर्ष व थेट व्दितीयवर्ष - पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर तांत्रिक पाठयक्रमांना (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेयव्यवस्था तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, संगणक उपयोजन (Computer Application), द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे:-

१. *संक्षिप्त नाव व प्रारंभ, -*

(१)या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर तांत्रिक पाठयक्रमांना द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन), नियम २०१६ असे म्हणावे

(२) ते दिनांक ११ मार्च २०१६ पासून अंमलात येतील.

*२. व्याख्या, -*

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) “अधिनियम” याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८), असा आहे;

(ख) “प्रवेश उपस्थिती केंद्र” याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे;

(ग) “अखिल भारतीय जागा” याचा अर्थ, कोणत्याही पात्र भारतीय नागरिक उमेदवारास उपलब्ध होणाऱ्या जागा, असा आहे;

(घ) “आवेदनापत्राचा नमुना” याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता संगणकीय पध्दतीने (ऑनलाईन) भरावयाचा विहित नमुना, असा आहे;

(ङ)“स्वायत्त संस्था” याचा अर्थ,ज्या संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे अशी संस्था, असा आहे;

(च) “केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) जागा” याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) ज्या जागा भरण्यात येतात अशा जागा, असा आहे;

(छ) “पाठयक्रम” याचा अर्थ, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेयव्यवस्था तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र आणि संगणक उपयोजन (Computer Application) यांमधील पदव्युत्तर तांत्रिक पाठयक्रम, असा आहे;

(ज)“पात्र उमेदवार” याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (१)अनुसार शासनाने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार विविध व्यावसायिक पाठ्याक्रमांसाठी पात्र असणारे उमेदवार, असा आहे;

(झ) “सुविधा केंद्र” याचा अर्थ, जेथे आवेदनपत्रासंबंधातील सामग्रीची विक्री, संगणकीय पध्दतीने (ऑनलाईन) अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी व तक्रारींचे निवारण करणे यांसारख्या सेवा पुरविल्या जातात, असे केंद्र, असा आहे;

(ञ) “मूळ विद्यापीठ” याचा अर्थ, यातील  नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार विद्यापीठ क्षेत्र, असा आहे;

(ट) “एचएससी” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेली उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) परीक्षा अथवा मान्यताप्राप्त मंडळांकडून देण्यात येणारे त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे;

(ठ) “संस्थास्तरीय कोटा” याचा अर्थ,शासनाने किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी जाहीर केल्यानुसार संस्थास्तरावर पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी उपलब्ध असणाऱ्या जागा, असा आहे;

(ड) “परस्पर गुणवत्ता” याचा अर्थ, विविध वर्ग किंवा प्रवर्गांतील उमेदवारांच्या गुणवत्तेच्या आधारे, असा आहे;

(ढ) “अल्पसंख्याकासाठी जागा” याचा अर्थ, ती संस्था ज्या अल्पसंख्याक समाजाकरिता आहे अशा, राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा, असा आहे;

(ण) “बिगर स्वायत्त संस्था” याचा अर्थ, ज्या संस्था स्वायत्त संस्था नाहीत अशा संस्था, असा आहे;

(त) “भारताचे समुद्रपार नागरिक” याचा अर्थ, केंद्र सरकारने नागरिकत्व अधिनियम १९५५ च्या कलम ७क अनुसार घोषित केलेला भारताचे (समुद्रपार) नागरिकत्व म्हणून नोंदणी झालेला उमेदवार किंवा व्यक्ती असा असून त्यामध्ये भारतीय वंशाच्या व्यक्तींचा समावेश होतो;

*स्पष्टीकरण:-* या खंडाच्या प्रयोजनार्थ, सर्व विद्यमान भारतीय वंशाच्या व्यक्तीं म्हणजे ज्यांनी गृह मंत्रालय भारत सरकारच्या, अधिसूचना क्र.२६०११/०४/९८/एफ (एक) दिनांक १९ ऑगस्ट, २००२ अनुसार नोंदणीकृत कार्डधारक आहेत आणि ज्यांना आता गृह मंत्रालय भारत सरकारच्या, अधिसूचना क्र. २५०२४ /९/२०१४/एफ (एक) दिनांक ९ जानेवारी, २०१५ अनुसार भारताचे समुद्रपार नागरिक कार्डधारक असल्याचे समजण्यात येईल;

(थ) “मूळ विद्यापीठाबाहेरील (ओएचयू)” याचा अर्थ, मूळ विद्यापीठ क्षेत्राबाहेरील क्षेत्र, असा आहे;

(द) “अर्हता परीक्षा” याचा अर्थ, ज्या परीक्षेच्या आधारे एखादा उमेदवार प्रवेशाकरिता पात्र होतो अशी परीक्षा किंवा तिला समतुल्य असलेली परीक्षा, असा आहे;

(ध)“प्रायोजित उमेदवार ” याचा अर्थ, ज्या उमेदवारास एखादी नोंदणीकृत भागीदारी संस्था/ कंपनी/ उद्योग / शैक्षणिक आणि/किंवा संशोधन संस्था/ किंवा शासकीय विभाग किंवा शासनाची स्वायत्त संस्था अशा ठिकाणचा अर्हता पदवीचा निकाल घोषित झाल्याच्या तारखेनंतर ते अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत कमीत कमी दोन वर्षांचा, ज्या क्षेत्रामध्ये प्रवेश मागण्यात येत असेल त्या संबंधित क्षेत्रातील, पूर्ण वेळ कामाचा अनुभव असेल, असा उमेदवार, असा आहे;

(न) “एसएससी” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा किंवा मान्यताप्राप्त मंडळांकडून देण्यात येणारे त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे;

(प) “अधिसंख्य जागा”याचाअर्थ, समुचित प्राधिकरणाने आणि शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या, मंजूर प्रवेशक्षमतेहून अधिक असतील अशा जागा, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्द्प्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

*३.आवेदनपत्र मागविणे* ६ (१)सक्षम प्राधिकारी व्यावसायिक शैक्षणिक संस्थामध्ये त्या शैक्षणिक वर्षाकरिता ज्या व्यावसायिक पाठ्याक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आवश्यक आहे अशा पाठ्यक्रमांना प्रवेश मिळविण्यासाठी सीईटीमध्ये सहभागी होण्या करिता उमेदवारांकडून संगणकीय पद्धतीने (ऑनलाईन) अर्ज मागवील.
(२) व्यावसायिक पाठ्यक्रमांना उमेदवारांनी प्रवेश मिळवण्याबाबत खालील प्रमाणे

कार्यपद्धती असेल,-

(क) या नियमांच्या नियम ७(१), ७(२) , ७(३) आणि ७(५)(ख) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार सक्षम प्राधिकरणाकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश मिळावा यासाठी आवेदनपत्र सादर करतील;

(ख) या नियमांच्यानियम ७(४) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार प्रथम सक्षम प्राधिकाऱ्याकडे आवेदनपत्र सादर करतील, त्यानंतर सक्षम प्राधिकारी अशा सर्व उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील जेणेकरून अशा अर्जदारांना, समुचित प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केल्यानुसार परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देणे संस्थेस शक्य होईल;

(ग) या नियमांच्यानियम ७(४) व ७(५)(क) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर संस्थास्तारावरील प्रवेशासाठी संबंधित संस्थेकडे आवेदनपत्र सादर करतील. संस्था,सक्षम प्राधिकाऱ्याने तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देईल.

(३) उमेदवाराने आवेदनपत्रासोबत लागू असतील त्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या आवश्यक प्रपत्रात सादर करावीत.

*४. सीईटी परीक्षेचे माध्यम, स्वरूप, अभ्यासक्रम, वेळापत्रक इत्यादी जाहीर करणे,-*

(१) सक्षम प्राधिकारी (सामायिक प्रवेश प्रक्रियेसंबंधी) सीईटीसंबंधी पुढील माहिती घोषित करील:-

(क) सीईटी परीक्षेचे माध्यम;

(ख) सीईटी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप;

(ग) सीईटी परीक्षा घेण्याची पध्दत;

(घ) सीईटी परीक्षेचे वेळापत्रक;

(ङ ) सीईटी प्रवेशपत्र वितरण;

(च) सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर करणे, इत्यादी.

(२) सक्षम प्राधिकारी,संचालक, तंत्र शिक्षण यांच्याशी विचारविनिमय करून सीईटीसंबंधी परीक्षेचा अभ्यासक्रम व इतर माहिती घोषित करील.

*५. उमेदवारीचे प्रकार,-*

(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी,-

| प्रकार | पात्रतेचेनिकष | मूळ विद्यापीठ |
|---|---|---|
| ए | (एक)एचएससी किंवा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका किंवा औषधनिमार्णशास्त्र पदविका तसेच | अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे ठिकाण ज्या |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार **आणि**<br>(दोन)जो एकतर महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे आणि/ किंवा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला आहे, असा उमेदवार | संबंधित विद्यापीठ क्षेत्राच्या अधिकारक्षेत्रांतर्गत येत असेल ते विद्यापीठ. |
| बी | जो उमेदवार प्रकार "ए" मधील निकषांची पूर्तता करीत नसेल, परंतु तो किंवा त्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असून त्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे, असा उमेदवार. | अधिवास प्रमाणपत्र देण्या-या प्राधिकरणाचे ठिकाण ज्या संबंधित विद्यापीठ क्षेत्राच्या अधिकारक्षेत्रांतर्गत येत असेल ते विद्यापीठ |
| सी. | जो उमेदवार प्रकार "ए" व प्रकार"बी" मधील निकषांची पूर्तता करीत नसेल, परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई केंद्रशासनाचे किंवा केंद्रशासनाच्या उपक्रमातील कर्मचारी आहेत व ज्यांची पदस्थापना महाराष्ट्र राज्यात झालेली आहे व कॅपसाठी आवेदनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी ते महाराष्ट्र राज्यात कामावर रुजू झालेले आहेत, असा उमेदवार | उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे ठिकाण ज्या संबंधित विद्यापीठक्षेत्राच्या अधिकारक्षेत्रात येत असेल ते विद्यापीठ. |
| डी | जो उमेदवार प्रकार "ए", प्रकार"बी", व प्रकार "सी" मधील निकषांची पूर्तता करीत नसेल, परंतु त्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र शासनाचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाचे कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी आहेत, असा उमेदवार. | उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे किंवा ते निवृत्त झाल्यास निवृत्तीनंतर स्थायिक झाल्याचे ठिकाण किंवा त्यांचीजर महाराष्ट्राबाहेर प्रतिनियुक्ती करण्यात आली असेल तर, अंतिम पदस्थापनेचे ठिकाण ज्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रात येत असेल ते विद्यापीठ. |
| ई | जे उमेदवार एच एस सी उत्तीर्ण किंवा अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान किंवा औषधनिर्माणशास्त्र यामधील पदविका उत्तीर्ण आहेत , तसेच वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्रामध्ये स्थित मान्यताप्राप्त संस्थेची अर्हता परीक्षादेखील उत्तीर्ण असतील आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार | मूळ विद्यापीठाबाहेरील किंवा राज्यस्तरीय जागांसाठी उमेदवाराचा विचार करण्यात येईल. |

(२)*अखिल भारतीय उमेदवारी,*- भारतीय नागरिकत्व असणारे उमेदवार, या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

(३)*अल्पसंख्याक उमेदवारी,*- राज्यांतर्गत असलेल्या आणि शासनाने अधिसूचित केलेल्या एखाद्या विशिष्ट भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्याक समाजातील, महाराष्ट्राचे अधिवासी असलेले उमेदवार या प्रवार्गाखाली पात्र आहेत.

(४)*अनिवासी भारतीय उमेदवारी,*- अधिनियमाच्या कलम २ खंड (ढ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शर्तींची पूर्तता करणारे, उमेदवार या प्रवार्गाखाली पात्र आहेत.

(५)*विदेशी विद्यार्थी किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले किंवा भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार,*- अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) मध्ये नमूद केलेले विदेशी विद्यार्थी उमेदवार, नियम २ च्या खंड (त) मध्ये व्याख्या करण्यात आलेले भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले उमेदवार व अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ण) मध्ये व्याख्या करण्यात आलेले भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार, या प्रवार्गाखाली पात्र आहेत.

(६)*जम्मू व काश्मीर स्थलांतरितांसाठी उमेदवारी,*- (क) आतंकवादी कारवायांमुळे १९९० पासून जम्मू व काश्मीरमधून भारताच्या कोणत्याही भागात किंवा व जम्मू व काश्मीरच्या असुरक्षित सीमाक्षेत्रातून, जम्मू व काश्मीरमधील त्यामानाने सुरक्षित ठिकाणी विस्थापित होऊन आलेले आहेत अशा नागरिकांची मुले; किंवा

(ख) भारतीय प्रशासन सेवा (भाप्रसे) किंवा भारतीय पोलीस सेवा (भापोसे) किंवा भारतीय विदेश सेवा (भाविसे) यामधील अधिकाऱ्यांची मुले आणि आतंकवादी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीरमध्ये बदली झालेल्या, तसेच प्रवेशाकरिता आवेदनपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी कामावर रुजू झालेल्या, लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचाऱ्यांची मुले; किंवा

(ग) आतंकवादाचा सामना करण्यासाठी जम्मू व काश्मीरमध्ये कार्यरत असलेल्या पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची मुले, या प्रवार्गाखाली पात्र असतील.

६.*विविध पाठयक्रमांकरिता मंजूर प्रवेशक्षमता व अधिसंख्य जागा,*- (१))जे प्राधिकरण संबंधित पाठयक्रमांना मान्यता देण्याकरिता सक्षम आहे त्या प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार आणि संबंधित संलग्न विद्यापीठाने दिलेल्या संलग्नतेनुसार प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी पाठ्याक्रमाची आणि थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश) स्वतंत्र तुकडी पदव्युत्तर पदवी पाठयक्रमांची मंजूर प्रवेशक्षमता असेल. थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश देण्यासाठी (आनुषंगिक प्रवेश) *अनुसूची-दोन* मध्ये दिल्याप्रमाणे उपलब्ध जागांची गणना करण्यात येईल.

(२) या शैक्षणिक संस्थांमध्ये समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी मान्यता दिल्यानुसार

अधिसंख्य जागा प्रवेशासाठी उपलब्ध असतील.

**७. जागावाटप,**-मूळ विद्यापीठातील तसेच मूळ विद्यापीठाबाहेरील व राज्य स्तरावरील विविध प्रवर्गातील उमेदवारांकरिता जागांच्या वाटपाची टक्केवारी ही, विविध पदव्युत्तर पाठयक्रमांच्या प्रथम वर्षासाठी *अनुसूची-एक* मध्ये, आणि थेट दुसऱ्या वर्षासाठी *अनुसूची-दोन* मध्ये दिलेल्या शासन धोरणानुसार असेल;

(१)*महाराष्ट्र राज्य उमेदवारीसाठी जागा,*- या नियमांच्या नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्टकेल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार हे या जागांसाठी पात्र असतील.

**(२)अखिल भारतीय उमेदवारीसाठी जागा,**- या नियमांच्या नियम ५(२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उमेदवारी असलेले उमेदवार हे या जागांसाठी पात्र असतील.

३)*अल्पसंख्याक कोटयातील जागा,*- या नियमांच्या नियम ५(३)मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार *अनुसूची-एक* व *अनुसूची-दोन* मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे या जागांसाठी पात्र असतील. या जागा अधिनियमाच्या कलम ६ मधील पोटकलम २ च्या तरतुदीनुसार भरण्यात येतील;

(४) *संस्थास्तरावरील कोट्यातील जागा,*- संस्थेला मंजूर प्रवेश क्षमतेच्या २० टक्के पर्यंत पात्र उमेदवारांना प्रवेश देता येतील, हे प्रवेश खालील शर्तींच्या अधीन देण्यात येतील:-

(एक) या नियमांच्या नियम ५(१), ५(२), ५(३), ५(४) आणि ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या कोट्यातील जागांवर प्रवेशासाठी पात्र असतील;

(दोन) जास्तीत जास्त ५ टक्के जागा, समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्यास अनिवासी भारतीय उमेदवारामधून संस्था स्तरावर भरता येतील;

(तीन) अनिवासी भारतीय उमेदवारासाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्यास, अशा रिक्त जागा संस्थेस अखिल भारतीय उमेदवारी असणाऱ्या पात्र उमेदवारामधून भरता येतील.

परंतु, या रिक्त जागा भरताना त्या महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणाऱ्या उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य देण्यात येईल.

*(५) अधिसंख्य जागा,-*

(क) *भारताचे समुद्रापार नागरिकत्व असलेल्या/ भारतीय वंशाच्या व्यक्ती, विदेशी विद्यार्थी, आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले,-*

(एक) या नियमांच्या नियम ५(५) मध्ये दिल्यानुसार उमेदवारी असणारे आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले असलेले उमेदवार या अधिसंख्य जागासाठी पात्र असतील;

(दोन) या जागा मंजूर प्रवेश क्षमतेच्या कमाल १५ टक्के किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असतील. या १५ टक्के जागांपैकी एक तृतीयांश जागा या आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असतील व दोन तृतीयांश जागा भारताचे समुद्रापार नागरिक/ भारतीय वंशाच्या व्यक्ती /विदेशी विद्यार्थी असलेल्या उमेदवारासाठी, राखीव असतील;

(तीन) या जागा,संस्था,या नियमांच्या नियम ८ मध्ये दिलेल्या पद्धतीचा अवलंब करून उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरील.

(ख) *जम्मू काश्मीर मधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवार,-*

(एक) या नियमांच्या नियम ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या जागासाठी पात्र असतील;

(दोन) या कोट्यातीलजागांची संख्या शासनाच्या धोरणा नुसार असेल;

(तीन) या जागा सक्षम प्राधिकारी भरेल.

*८.गुणवत्ता यादी तयार करणे,-* **(१) गुणानुक्रम देणे ,-** ज्या उमेदवारानी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश मिळण्यासाठी आवेदनपत्र सादर करण्याकरिता विनिर्दिष्ट केलेल्या अंतिम  दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी आवेदनपत्र सादर केले आहे, अशा सर्व पात्र उमेदवारांना गुणानुक्रम देण्यात येईल.

**(२) पडताळणीमुळे गुणांमध्ये होणारा बदल,-** गुणांची पडताळणी केल्यामुळे अर्हता परीक्षेमधील गुणांमध्ये फेरबदल झाले असतील आणि संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा मंडळाने ते गुण यथोचितरीत्या प्रमाणित केलेले असतील तर, ते गुण, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशासाठीच्या  सक्षम प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या पदनिर्देशित प्रतिनिधींना तात्काळ कळविण्यात येतील.  तथापि, अशा बदलामुळे होणारा परिणाम, केवळ प्रवेशाच्या नंतरच्या फेरीसाठी (फेऱ्यांसाठी) विचारात घेण्यात येईल.

**(३) पात्रता ठरविण्यासाठी अर्हता परीक्षेतील गुणांची गणना करण्याची पध्दत,-** उमेदवारांची पात्रता ठरविताना पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल,

(क) दशांशानंतर दोन स्थानांपर्यंत पूर्णांक करून घेऊन गुणांच्या टक्केवारीची गणना करण्यात येईल;

(ख) एसएससी, एचएससी, पदविका, पदवी किंवा त्यांच्याशी समतुल्य परीक्षेत अक्षरी श्रेणी दिलेल्या असतील तर, उमेदवाराने, आवेदनपत्र सादर करण्याच्या वेळी, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून किंवा मंडळाकडून अक्षरी श्रेणींचे समतुल्य गुणांमध्ये रूपांतर करुन घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. समतुल्य गुणांच्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल;

(ग) जर उमेदवार सर्व विषय घेऊन अर्हता परीक्षेला पुन्हा बसला असेल तर केवळ शेवटी दिलेल्या परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांचाच विचार करण्यात येईल.

(४) **विविध पाठ्यक्रमांच्याप्रवेशासाठी गुणानुक्रम देणे,-** *(क)* प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेयव्यवस्था तंत्रज्ञान, प्रथम व थेट व्दितीयवर्ष संगणक उपयोजन,-

(एक) या नियमांच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारी असणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिकाऱ्याने घेतलेल्या सीईटीत (सामाईक प्रवेश परीक्षेत) उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा या पाठयक्रमांच्या प्रवेशासाठी शासनाने घोषित केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे, तयार करण्यात येईल:

परंतु, सारखेच गुण, प्राप्तांक किंवा टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल:-

(क) एचएससी परीक्षेत गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एसएससी परीक्षेत गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एसएससी परीक्षेमध्ये विज्ञान या विषयातील अधिकतम गुण;

(घ)एसएससी परीक्षेमध्ये गणित या विषयातील अधिकतम गुण;

(ङ)एसएससी परीक्षेमध्ये इंग्रजी या विषयातील अधिकतम गुण.

(दोन) या नियमांच्या नियम ५(४) व ५(५) मध्ये नमूद केल्याप्रमाणेअनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व आणि विदेशी विद्यार्थी असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी ही, अर्हता परीक्षेमध्ये उमेदवारास मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल:

परंतु, टक्केवारी सारखीच असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल:-

(क) एचएससी परीक्षेत गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एसएससी परीक्षेत गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एसएससी परीक्षेमध्ये विज्ञान या विषयातील अधिकतम गुण;

(घ)एसएससी परीक्षेमध्ये गणित या विषयातील अधिकतम गुण;

(ङ) एसएससी परीक्षेमध्ये इंग्रजी या विषयातील अधिकतम गुण.

९.**केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप)**-(१) विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश देतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे टप्पे खाली नमूद

केल्याप्रमाणे असतील,-

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने माहिती पुस्तिका प्रदर्शित करणे किंवा प्रसिध्द करणे;

(ख) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना संगणकीय (ऑनलाईन) पध्दतीने भरणे;

(ग) उमेदवाराने सुविधा केंद्रावर व्यक्तिश: संगणकीय (ऑनलाईन) आवेदनपत्राच्या नमुन्यास पुष्टी देणे व कागदपत्रांची पडताळणी करून घेणे;

(घ) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे किंवा प्रकाशित करणे, तक्रारी, असल्यास, त्या दाखल करुन घेणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे किंवा प्रसिध्द करणे;

(ङ)केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या, प्रवर्गनिहाय जागा (जागांची रचना) प्रदर्शित करणे;

(च) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीपूर्वी, पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा संगणकीय (ऑनलाइन) विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या पसंतीने संस्था व पाठयक्रम याबाबतचे शक्य असतील असे जास्तीत जास्त पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येतील. उमेदवाराने विकल्प अर्जास पुष्टी दिल्यानंतर, तो अर्ज केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीमध्ये जागा वाटपासाठी विचारात घेण्यात येईल;

(छ) वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे;

(ज) उमेदवाराने उपस्थिती केंद्रावर उपस्थित होणे आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील जागा वाटपानुसार देऊ केलेली जागा स्वीकारणे.

(२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप) जागा वाटप केलेली असल्यास, ती स्वीकारण्यापूर्वी, उमेदवाराला खाली तरतूद केल्याप्रमाणे जागावाटपाच्या नंतरच्या फेरीसाठी (फेऱ्यांसाठी), शैक्षणिक अध्ययनक्रमाच्या फ्रीझ्, स्लाईड किंवा फ्लोट या विकल्पांची निवड करता येईल.

**(क)** ***फ्रीझ:*** उमेदवार त्यांना देऊ केलेली जागा स्वीकारतील आणि त्यांना जागावाटपाच्या पुढील कोणत्याही फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याची इच्छा असणार नाही, अशा उमेदवारांचा नंतरच्या प्रवेश फेऱ्यांमध्ये विचार केला जाणार नाही;

**(ख)** ***स्लाईड:*** उमेदवार त्यांना देऊ करण्यात आलेली जागा स्वीकारतील आणि त्याच संस्थेमध्ये वरच्या पसंतीक्रमाच्या शैक्षणिक अध्ययनक्रमात प्रवेश देऊ करण्यात आला तर, तो स्वीकारतील असा निर्देश करतील. अशा उमेदवारांचा त्यानंतरच्या प्रवेश फेऱ्यांमध्ये

विचार केला जाईल;

**(ग)** ***फ्लोट:*** उमेदवार त्यांना देऊ करण्यात आलेली जागा स्वीकारतील आणि इतर कोणत्याही संस्थेमध्ये वरच्या पसंतीक्रमाच्या शैक्षणिक अध्ययनक्रमाला प्रवेश देऊ करण्यात आला तर, तो स्वीकारतील असा निर्देश करतील. अन्यथा त्यांना सध्या स्वीकारलेला शैक्षणिक अध्ययनक्रमदेखील स्वीकारतील, अशा उमेदवारांचा त्यानंतरच्या प्रवेश फेऱ्यांमध्ये विचार केला जाईल;

**(घ)**ज्या उमेदवारांनी फ्लोट किंवा स्लाईड हा पर्याय निवडलेला असेल आणि त्यांना वरच्या पसंतीक्रमाची त्यांच्या निवडीची जागा मिळाली असेल, अशा वेळी त्या उमेदवारांनी अगोदरच्या फेरीमध्ये स्वीकारलेली जागा ते आपोआप गमावतील;

(ङ)ज्या उमेदवारांना त्यांच्या पहिल्या पसंतीचा प्रवेश देऊ करण्यात आला आहे अशा उमेदवारांना फ्लोट किंवा स्लाईड हे पर्याय उपलब्ध असणार नाहीत.

**(३) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅपची) चौथी फेरी आयोजित करणे** -(क) या फेरीकरिता उपलब्ध जागा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांना संगणकीय पध्दतीने (ऑनलाईन) विकल्प नमुना भरण्यास किंवा पूर्वी भरलेल्या नमुन्यामध्ये बदल करण्यास मुभा देण्यात येईल.या फेरीदरम्यान वाटप करावयाच्या जागा पुढील शर्तींच्या अधीनतेने देण्यात येतील,-

(एक) ही फेरी सुरु होण्यापूर्वी, उमेदवारांना स्लाईडिंग किंवा फ्लोटिंग या विकल्पावरुन फ्रिझिंग किंवा नेमके त्या उलट क्रमाने आपला विकल्प बदलता येईल;

(दोन) ज्या उमेदवारांना अगोदरच्या कोणत्याही फेऱ्यांमध्ये कोणतीही जागा मिळालेली नाही अथवा ज्यांनी अगोदरच्या फेऱ्यांमध्ये त्यांचा प्रवेश घेऊन तो रदद केला आहे अथवा ज्यांनी फ्रीझचा विकल्प निवडला होता व जे या अंतिम फेरीमध्ये फ्लोटिंग व स्लाईडिंग विकल्प निवडण्यास इच्छुक आहेत असे उमेदवार या फेरीमध्ये भाग घेण्यास पात्र असतील;

(तीन) ज्यांनी फ्लोटिंग व स्लाईडिंग या विकल्पाची निवड केली असेल आणि जे या फेरीकरितादेखील अर्ज करीत असतील असे उमेदवार, त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेल्या संस्थेचे नांव त्यांच्या पसंतीक्रमाच्या यादीत नमूद करतील. एकदा का वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की मग,अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल;

(चार) स्लाईडिंग व फ्लोटिंग हे विकल्प या फेरीमध्ये वाटप केलेल्या जागांसाठी असणार नाहीत.

(ख) उमेदवार उपस्थिती केंद्रावर उपस्थित राहील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चौथ्या फेरीच्या वाटपानुसार देऊ केलेली जागा स्वीकारील.

(४) *संस्थेमध्ये उपस्थित राहून प्रवेश कायम करणे,-* केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम फेरीनंतर, उमेदवार त्यास वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहील व त्या संस्थेतील आपला प्रवेश कायम करील.

*१०.केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) वाटपाचे टप्पे आणि पद्धती.-*केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅपअंतर्गत) येणाऱ्या जागांचे वाटप पुढील पद्धतीनुसार करण्यात येईल,-

(१) *महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार,-* संगणकीकृत वाटपाचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत,-

<u>टप्पा एक</u> :- *सर्व उमेदवारांसाठी,-*

(क) विविध प्रवर्गातील सर्व उमेदवारांचा (खुला, राखीव) त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार वाटपाकरिता विचार करण्यात येईल;

(ख)संस्था ज्या अल्पसंख्याक समाजाकरीता आहे त्या समाजातील, राज्याच्या उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे अल्पसंख्यांकासाठीच्या जागांचे वाटप करण्यात येईल किंवा अशा जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध नसल्यास खुल्या प्रवर्गातील जागांचे त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्यात येईल;

(ग) मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या परस्परगुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागांसाठी विचार करण्यात येईल किंवा खुल्या प्रवर्गातील जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गात जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(घ) विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल आणि जे उमेदवार विशेष मागास प्रवर्गामध्ये त्यांचा समावेश होण्यापूर्वी मागासवर्ग प्रवर्गामध्ये होते अशा विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, त्यांच्या मूळ मागासवर्ग प्रवर्गातील जागा वाटपासाठी त्यांचा विचार करण्यात येईल;

(ङ)विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल. अशा प्रकारच्या जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(च) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र पाठ्यक्रमांसाठी, प्रायोजित आणि अप्रायोजित उमेदवारांना त्यांची परस्पर गुणवत्ता विचारात घेऊन जागावाटप करण्यात येतील.

<u>टप्पा-दोन</u> : *विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता,-*जर मागासवर्ग प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त राहिलेल्या जागांच्या कमाल २ टक्के इतक्या

मर्यादेपर्यंत, विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

<u>टप्पा-तीन</u>: *मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांच्या संबंधित गटासाठी,-* जर पुढील मागासवर्ग प्रवर्गातील संबंधित गटातील जागा रिक्त राहिल्या तर, त्या रिक्त राहिलेल्या जागांचे वाटप संबंधित गटामधील उमेदवारांना करण्यात येईल;

**गट-१ :** **(एक)** अनुसूचित जाती व बौध्द धर्मांतरित अनुसूचित जाती (एससी);

**(दोन)** विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणाऱ्या जमातींसह अनुसूचित जमाती (एसटी).

**गट-२:** **(एक)** विमुक्त जाती/निरधिसूचित जमाती (व्हीजे/डीटी)/ एनटी( ए);

**(दोन)** भटक्या जमाती १ (एनटी-बी).

**गट-३** **(एक)** भटक्या जमाती २ (एनटी-सी);

**(दोन)** भटक्या जमाती ३ (एनटी-डी);

**(तीन)** इतर मागासवर्ग (ओबीसी).

<u>स्पष्टीकरण</u>:-गट १ साठी, अनुसूचित जमाती प्रवर्गातील जागा त्यातील उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे रिक्त राहिल्या असतील तर त्या जागांचे अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्याकरिता विचार केला जाईल किंवा तसेच उलटपक्षी अनुसूचित जाती प्रवर्गातील जागांबाबत केले जाईल.

<u>टप्पा-चार</u> : *सर्व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी,-* मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्या असतील, तर अशा जागांचा विचार कोणत्याही मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्यासाठी करण्यात येईल.

<u>टप्पा-पांच</u>: *विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांसाठी,-* विकलांग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्या असतील तर, कोणत्याही विकलांग व्यक्ती उमेदवारांना अशा जागांचे वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल.

<u>टप्पा-सहा</u>: *सर्व उमेदवारांसाठी (मूळ विद्यापीठ व मूळ विद्यापीठेतर असा फरक वगळून),-* टप्पा पांच पूर्ण झाल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर, त्यावेळी अशा रिक्त जागांच्या वाटपासाठी, मूळ विद्यापीठ व मूळ विद्यापीठेतर असा फरक वगळून, टप्पा-एक, टप्पा-तीन, टप्पा-चार, व टप्पा-पाच पार पाडण्यात येईल.

<u>टप्पा-सात</u>:*सर्व उमेदवारांसाठी (कोणत्याही प्रकारचे आरक्षण वगळून),-*सर्व पात्र उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे या जागांचे वाटप करण्याचा विचार करण्यात येईल.

(२)*अखिल भारतीय उमेदवारीअसणाऱ्या उमेदवारासाठीच्या जागा,-*

या जागा, पात्र उमेदवारांना प्राप्तांकाच्या आधारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत वाटप करण्यात येतील,-

(क) प्रथम वर्ष व्यवस्थापनशास्त्र§ सक्षम प्राधिकरणाद्वारे आयोजित सीईटी, पदवीधर व्यवस्थापन प्रवेश परिषद (युएसए) व्दारे घेण्यात येणारी पदवीधर व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (GMAT), भारतीय व्यवस्थापन संस्थेव्दारा आयोजित सामाईक प्रवेश परीक्षा (CAT), भारतीय व्यवस्थापन असोसिएशनव्दारा आयोजित व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (MAT),भारतीय व्यवस्थापन प्रशाला असोसिएशनद्वारा आयोजित व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा (ATMA), झेवियर्स व्यवस्थापन प्रशाला जमशेदपूर यांनी आयोजित केलेली अभियोग्यता चाचणी परीक्षा (XAT), अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेद्वारा आयोजित सामाईक व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (CMAT),परीक्षांच्या पर्सेंटाईलच्या आधारे;

(ख) प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र§अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या पदवीधर फार्मसी अभियोग्यता चाचणी (GPAT) परीक्षेतील गुणांच्या आधारे;

(ग) प्रथमवर्ष वास्तुशास्त्र § सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे;

(घ) प्रथम व थेट व्दितीय वर्ष, संगणक उपयोजन सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे;

(ङ)प्रथमवर्ष हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान (एचएमसीटी) § सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे.

या सर्व जागा "सर्वसाधारण प्रवर्गातील" जागा म्हणून समजण्यात येतील आणि या जागांमध्ये, मागासप्रवर्ग, विकलांग व्यक्ती इ. उमेदवारांकरिता कोणतेही आरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

११.*केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीव्दारे जागा वाटप ,-*

(क) कॅपच्या चारही (पहिली, दुसरी, तिसरी व चौथी) फेऱ्यांमध्ये संगणकीय प्रणाली वापरून जागाचे वाटप करण्यात येईल.

(ख) कॅपच्या पहिल्या , दुसऱ्या व तिसऱ्या फेरीमध्ये, या नियमांच्या नियम १० मधील टप्पा एक ते तीन पार पाडण्यात येईल.

ग) जागा वाटप न होणे व उमेदवार उपस्थित न राहणे यामुळे जर जागा रिक्त राहिल्या तर, अशा जागांचे वाटप त्यापुढील फेरीमध्ये करण्यात येईल.

घ) कॅपच्या चौथ्या फेरीकरिता, या नियमांच्या नियम१० मधील टप्पा-एक ते टप्पा-सात पार पाडण्यात येतील.

१२.*सर्वसाधारण सूचना,-*

क) कॅपच्या पहिल्या , दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेऱ्यांमधील मूळ विद्यापीठ जागांचे, मूळ विद्यापीठेतर जागांचे आणि राज्यस्तरीय जागांचे वाटप, महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार केले जाईल. उमेदवारांना, परस्पर गुणवत्ता, त्यांनी भरलेले विकल्प आणि कॅपच्या पहिल्या , दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेऱ्यांमध्ये त्यावेळी उपलब्ध असलेल्या जागा, यानुसार जागांचे वाटप केले जाईल;

(ख) जागा वाटपाच्या विशिष्ट टप्प्यासाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांचा, जरी त्यांनी अगोदरच्या टप्प्यामध्ये जागा वाटप करण्यात आलेले असेल किंवा नसेल तरी, त्या टप्प्यामध्ये जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(ग) कोणत्याही टप्प्याच्या जागा वाटपादरम्यान, त्यावेळी असणाऱ्या जागांच्या उपलब्धतेप्रमाणे उमेदवाराने भरलेल्या विकल्पानुसार , त्याचा जागावाटपातील क्रम वर सरकत राहील;

(घ) विनानुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थामध्ये, या नियमांच्या नियम ७(२), ७(३), ७(४) आणि ७(५) मध्ये नमूद उमेदवारीसाठी उपलब्ध केलेल्या जागांसाठी व प्रायोजित प्रवर्गातील जागांच्या वाटपा करिता विविध प्रवर्गांअंतर्गत कोणत्याही प्रकारचे आरक्षण असणार नाही.

(ङ) सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांचा (विशेष मागासप्रवर्ग उमेदवाराचा त्यांच्या मूळ प्रवर्गामध्ये)त्यांच्यासाठी राखीव जगावर परस्पर गुणवत्तेच्या आधारे सर्व टप्प्यावर जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

(च) क्रम वर सरकल्यामुळे, रिक्त होणाऱ्या जागांचा, त्या टप्प्याच्या जागा वाटपाच्या तरतुदींनुसार त्याच टप्प्यावरील पुढील प्रक्रियेमध्ये जागा वाटप करण्याकरिता विचार करण्यात येईल;

(छ) भरण्यात आलेल्या पसंतीक्रमामधील पहिल्या उपलब्ध विकल्पानुसार करण्यात आलेले वाटप हे अंतिम वाटप म्हणून अबाधित ठेवण्यात येईल.

(ज) कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरी दरम्यान, टप्पा-दोन मध्ये विशेष मागासवर्गातील उमेदवारांना जागावाटप केले गेल्यामुळे, सर्व उमेदवारांच्या भल्यासाठी टप्पा दोननंतर जागा वाटपासाठी टप्पा एक पुन्हा घेण्यात येईल;

(झ) संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या वाटप यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिश: कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत;

(त्र) ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल तो उमेदवार “तात्पुरते जागावाटप पत्र” संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेईल. जागा-स्वीकृतीच्या वेळेस उमेदवारास, प्रवेश उपस्थिती केंद्रावर, सक्षम प्राधिकाऱ्याच्या नावे दर्शनी धनाकर्ष जमा

करावा लागेल. मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यावर आणि उमेदवार सर्व पात्रता निकषांची पूर्तता करत असल्याची खात्री पटल्यावर उपस्थिती केंद्राकडून जागा नक्की केली जाईल. केंद्र प्रभारी, स्वीकृतीची संगणकीय पावती देईल;

(ट) जागा-स्वीकृती शुल्क, सर्वसाधारण प्रवर्गातील, विमुक्त जाती/ निरधिसूचित जमाती, भटक्या जमाती / विशेष मागासवर्ग / इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.५,०००/-, आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१,०००/- एवढे असेल. हे शुल्क कॅप प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवार संबंधित संस्थेत उपस्थित झाल्यास रू.१,०००/- एवढे प्रक्रिया शुल्क वजा करून,संस्थेकडे हस्तांतरित केले जाईल आणि उमेदवाराने संस्थेला द्यावयाच्या शुल्कापोटी समायोजित केले जाईल. परंतु, जर उमेदवाराने संस्थेत उपस्थित होण्यापूर्वी प्रवेश रद्द केला तर, प्रक्रिया शुल्काचे रु.१,०००/- वजा करून उर्वरित रक्कम उमेदवारास परत करण्यात येईल;

(ठ) जागा-स्वीकृतीकरिता व्यक्तिश: उपस्थित न राहणे म्हणजे उमेदवाराने देऊ केलेली जागा नाकारली असल्याचे समजण्यात येईल;

(ड) जर कोणतीही कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे विधिअग्राहय किंवा खोटी असल्याचे आढळून आले आणि/किंवा उमेदवाराने पात्रता निकषांची पूर्तता केली नाही तर वाटप करण्यात आलेली जागा कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल;

(ढ) ज्या उमेदवारांना वाटप करण्यात आलेली जागा नाकारावयाची असेल त्यांनी उपस्थिती केंद्रावर स्वीकृती शुल्क भरू नये. वाटप केलेली जागा नाकारणारे उमेदवार, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या दुस-या आणि/किंवा तिसऱ्या फेरीमध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत.

१३. *संस्थास्तरीय कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेश,*-विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, या जागांवरील प्रवेश प्रक्रिया खालील पद्धतीचा वापर करून पार पाडील,-

(क) प्रवेशप्रक्रिया पारदर्शक रीतीने पार पाडण्यात येईल व ज्यांनी संस्थेकडे आवेदनपत्र सादर केलेले आहे अशा उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसारप्रवेश देण्यात येतील;

(ख) ज्यात प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले आहेत, अशी संस्थेची माहिती पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका, प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने प्रकाशित करण्यात यावी. माहिती पुस्तिकेमधील सर्व माहिती ही संस्थेच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी;

(ग) प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेकडून प्रत्येक पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण

जागांची संख्या, यांची जाहिरात किमान दोन प्रमुख वृत्तपत्रांमध्ये देऊन आणि संस्थेच्या संकेतस्थळावर अधिसूचित करून, संस्था आवेदनपत्र मागवतील;

(घ) प्रवेशासाठी वेळोवेळी, शासनाने अधिसूचित केलेले व समुचित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार, संस्था स्तरीय प्रवेशासाठी नियम ३(२)(ख) मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांच्याकडे आवेदनपत्र सादर करतील;

(ङ) संस्था समुचित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्यानुसार अनिवासी भारतीय कोट्यातील जागा सक्षम प्राधिकाऱ्याने तयार व प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीतील गुनानुक्रमाच्या आधारे भरतील .

(च) अनिवासी भारतीय कोट्यातील जागा वगळून, संस्था कोट्यातील जागा भरण्यासाठी, सक्षम प्राधिकरणाने प्रवेशासाठी तयार व प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीतील गुनानुक्रमाच्या आधारे संस्थेला उमेदवारांना प्रवेश देता येतील;

परंतु, जेथे समुचीत प्राधिकरणाने सामायिक प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश विनिर्दिष्ट केलेला असेल, अशा वेळी संस्था अनिवासी भारतीय कोट्यातील जागा वगळून, संस्था स्तरीय कोट्यातील जागा, या नियमांच्या नियम ८(४) मध्ये नमूद केल्यानुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे भरता येतील.

(छ) संस्था, संस्थास्तरावर, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांसह भारताचे समुद्रपार नागरिक/ भारतीय वंशाच्या व्यक्तीचा/ विदेशी विद्यार्थी, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले इत्यादींसाठी अधिसंख्य कोटा उमेदवारांची गुणवत्ता यादी (याद्या) तयार करील आणि सूचनाफलकावर प्रसिद्ध करील आणि ती यादी संस्थेच्या संकेतस्थळावरसुद्धा प्रसिध्द करील;

(ज) विनिर्दिष्ट केलेल्या पाठयक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशत: किंवा पूर्णत:), केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल;

(झ) घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती संगणकीय (ऑनलाईन) प्रणालीमार्फत तात्काळ संस्था अद्ययावत करतील;

(ञ) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जागा रिक्त झाल्यास ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ती ज्या प्रवर्गाकरीता राखुन ठेवलेली होती, त्याप्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल. तद्नंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा, अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

*१४. संस्था स्तरावरील प्रवेश फेरी,-* केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या सर्व फेऱ्या पार पडल्यानंतर

जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा संस्थास्तरावर सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्वमान्यतेने संस्थास्तरावरील फेरीद्वारे भरण्यात येतील.

१५. *गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता ,-* (१) प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर, अधिनियमाच्या कलम ९ च्या पोटकलम (५) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक विनानुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था, संचालक, तंत्र शिक्षण व प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे प्रवेश-मान्यतेसाठीचा प्रस्ताव सादर करतील.

(२) प्रवेश-मान्यतेसाठीच्या प्रस्तावामध्ये संस्था स्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व कोटा आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी,उमेदवारीचा प्रकार , आरक्षण, अर्हता गुण इत्यादी तसेच प्रवेशासाठीच्या आवश्यक कागदपत्रांचा समावेश असेल.

१६. *संस्थेमधील प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा,-*

(क) उमेदवार, प्रवेश रद्द करण्यासाठी संगणकीय (ऑनलाईन) अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर करील;

(ख) उमेदवाराकडून प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संस्था तात्काळ प्रवेश रद्द करील आणि संस्थेच्या लॉगईन मार्फत प्रवेश रद्द करण्याबाबत संगणकीय (ऑनलाईन) पोच देईल आणि उमेदवाराला स्वाक्षरित प्रत देईल;

(ग) प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी प्रवेश रद्द केल्यास, शुल्काचा परतावा, म्हणजेच एकूण शुल्कामधून रुपये १,०००/- एवढे प्रक्रिया शुल्क वजा करुन दोन दिवसांमध्ये किंवा समुचित प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या यथास्थिती वेळोवेळी निर्धारित मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येईल;

(घ) जर सक्षम प्राधिकाऱ्याने घोषित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर प्रवेश रद्द केला असेल तर, प्रतिभूती ठेव आणि तारण धन ठेव वगळता कोणताही परतावा मिळणार नाही.

*अनुसूची - एक*

(नियम ६ व ७ पहा)

## क. मंजूर प्रवेश क्षमतेअंतर्गत जागांचे वाटप

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | जागांची संख्या - मंजूर प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया जागा | | | संस्थास्तरीय जागा (कोटा) (एन आर आय साठीच्या ५% (कोटा) जागासह, लागू असल्यास) |
| | | महाराष्ट्र राज्यातील उमेदवार | अखिल भारतीय स्तरावरील जागा | अल्पसंख्याक समाजासाठी चा कोटा | |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पाठ्यक्रमांसाठी | | | | | |
| १ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | ८० टक्के (६० टक्के बिगर प्रायोजीत जागा व २० टक्के प्रायोजित जागा) | | काही नाही | २० टक्के (१५ टक्के बिगर प्रायोजित जागा व ५ टक्के प्रायोजित जागा) |
| २ | विनाअनुदानित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था | महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ ७५ टक्के बिगरप्रायोजित व २५ टक्के प्रायोजितसाठी | | किमान ५१ टक्के@ | २० टक्के(१५ टक्के बिगर प्रायोजित जागा व ५ टक्के प्रायोजित जागा) |
| वास्तुशास्त्र पाठ्यक्रमासाठी | | | | | |
| ३ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | ८० टक्के | | काही नाही | २० टक्के |
| ४ | विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ १०० टक्के | | किमान@ ५१ टक्के | २० टक्के |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| व्यवस्थापनशास्त्र पाठ्यक्रमासाठी | | | | | |
| ५ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | **स्वायत्त -**<br>६५ टक्के (राज्यस्तरीय)<br>**बिगर स्वायत्त -**<br>मूळ विद्यापीठासाठी ४५.५ टक्के, अन्य विद्यापीठासाठी १९.५ टक्के | १५ टक्के | काही नाही | २० टक्के |
| ६ | विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | **स्वायत्त -**<br>महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ १०० टक्के (राज्यस्तरीय)<br>**बिगर स्वायत्त -**<br>महाराष्ट्र राज्यातील जागां $ पैकी मूळ विद्यापीठासाठी ७० टक्के, व अन्य विद्यापीठासाठी ३० टक्के जागा | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत असणाऱ्या जागांपैकी १५ टक्के | किमान ५१ टक्के@ | २० टक्के |
| प्रथम वर्ष संगणक उपयोजन पाठ्यक्रमांसाठी | | | | | |
| ७ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | मूळ विद्यापीठासाठी ४५.५ टक्के, अन्य विद्यापीठासाठी १९.५ टक्के | १५ टक्के | काही नाही | २० टक्के |
| ८ | विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ मूळ विद्यापीठासाठी ७० टक्के, अन्य विद्यापीठासाठी ३० टक्के जागा | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत असणाऱ्या जागांपैकी १५ टक्के | किमान ५१ टक्के@ | २० टक्के |
| थेट व्दितीय वर्ष संगणक उपयोजन प्रवेशाकरिता | | | | | |
| ९ | विनाअनुदानित खाजगी | मूळ विद्यापीठासाठी ५६ टक्के , अन्य विद्यापीठासाठी | काही नाही | काही नाही | २० टक्के |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याका साठीच्या संस्था वगळून) | २४ टक्के | | | |
| १० | विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ मूळ विद्यापीठासाठी ७० टक्के, अन्य विद्यापीठासाठी ३० टक्के जागा | काही नाही | किमान ५१ टक्के@ | २० टक्के |

कॅप जागा = मंजूर प्रवेशसंख्या - संस्थास्तरीय जागा

# अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा वगळून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा

$महाराष्ट्र राज्यातील जागा = केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा § (अखिल भारतीय उमेदवारासाठी जागा + अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा )

% - टक्केवारी

* अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा व संस्थास्तारावरील जागा वगळता महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या व अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारामधून निर्धारित प्रमाणामध्ये भरण्यात येतील.

@अल्पसंख्यांक संस्था कमीत कमी टक्के जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून (अल्पसंख्याक समुदायाच्या उमेदवारामधून) भरेल. ही संख्या कमाल १०० टक्के पर्यंत असू शकेल. तथापि, प्रत्येक संस्था केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी त्यांच्या संस्थेतील अल्पसंख्यांक कोट्यातून भरावयाच्या जास्तीत जास्त टक्के (जागा) घोषित करतील आणि सक्षम प्राधिकाऱ्याला कळवतील.

## ख. अधिसंख्य जागांचे वाटप

(१) जम्मू व काश्मीर मधून विस्थापित झालेल्या उमेदवारासाठीचे प्रवेश सक्षम प्राधिकरण करेल, उपलब्ध जागांची संख्या शासनाच्या धोरणानुसार असेल.

(२) भारताचे समुद्रपार नागरिक/ भारतीय वंशाचे नागरिक, विदेशी विद्यार्थी व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या प्रवर्गातील उमेदवाराचे प्रवेश संस्था करेल. या जागांची संख्या मंजूर प्रवेशसंख्या जागांच्या १५% किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या मान्यतेनुसार असेल (लागू असल्यास).

## अनुसुची –दोन
## (थेट द्वितीय वर्ष प्रवेशाकरिता)
## (नियम ६ व ७ पहा)

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा विकल्प नमुना सादर करण्यापूर्वी, उपलब्ध जागांची विभागणी संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल.

(एक)- आनुषंगिक प्रवेशासाठीच्या जागा : मंजूर प्रवेशक्षमतेच्या २० टक्के, ज्या मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा अधिक, अधिसंख्य असतील.

(दोन) मंजूर प्रवेशक्षमतेतील रिक्त राहिलेल्या जागा (एस):-: उपरोक्त शिवाय एखाद्या पाठयक्रमाच्या रिक्त जागा , ज्याची गणना खालीलप्रमाणे करण्यात येईल त्या प्रवेशासाठी उपलब्ध असतील.

एस = एसआय - (एसआय अंतर्गत प्रवेश - सी - एफ +बी -एल + पी), जर

एस >० तर, त्यादेखील उपलब्ध असतील, जेथे

| गणना करताना वापरलेले संक्षेप | विवरण |
|---|---|
| एसआय | मंजूर प्रवेशक्षमता |
| एसआय अंतर्गत प्रवेश | मंजूर प्रवेशक्षमतेमधील जागांवर झालेले प्रवेश |
| सी | प्रथम वर्ष स्तरावर रद्द झालेल्या प्रवेशांची संख्या |
| एफ | संलग्न विद्यापीठाच्या नियमांनुसार व्दितीय वर्ष प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
| बी | संलग्न विद्यापीठाच्या नियमानुसार व्दितीय वर्ष प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या, अगोदरच्या तुकडीतील विद्यार्थ्यांची संख्या |
| एल | द्वितीय वर्षासाठी दुसऱ्या संस्थेतून संस्थेत आलेल्या आणि / किंवा त्याच संस्थेतील अन्य पाठ्यक्रमातून दुसऱ्या पाठ्यक्रमास बदलून घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
| एस | मंजूर प्रवेश क्षमते अंतर्गत रिक्त राहिलेल्या जागा |
| पी | व्दितीय वर्षासाठी दुसऱ्या संस्थेतून संस्थेत आलेल्या आणि/किंवा त्याच संस्थेतील अन्य पाठयक्रमातून दुसरा पाठयक्रम बदलून घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |

***स्पष्टीकरण -१,***मंजूर प्रवेश क्षमते अंतर्गत रिक्त राहिलेल्या जागांची गणना करताना, कोणत्याही प्रकारच्या अधिसंख्य जागेवर/जागांवर प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार नाही.

***स्पष्टीकरण -२*** वेळापत्रकानुसार, मंजूर प्रवेशक्षमते अंतर्गत रिक्त जागांची गणना करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठाचा / संस्थेचा निकाल घोषित करण्यात आला नसेल, तर "बी" चे

मूल्य हे अगोदरच्या तुकडयांमध्ये असलेल्या आणि मागील शैक्षणिक वर्षामध्ये परीक्षेला बसलेल्या उमेदवारांची एकूण संख्या म्हणून घेतले जाईल.

*स्पष्टीकरण -३,* निकाल घोषित झाल्यानंतर पुन:परिक्षार्थींना सामावून घेतल्यानंतरच केवळ पाठयक्रम बदलून दिला जाईल.

(क) **थेट व्दितीय वर्षाची स्वतंत्र तुकडी:- पाठयक्रमांच्या थेट व्दितीय वर्षाच्या स्वतंत्र तुकडीकरिता, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या, मंजूर प्रवेशक्षमतेच्या १०० टक्के या प्रमाणात या जागा असतील.**

थेट द्वितीय वर्षासाठी जागांची विभागणी

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | सक्षम प्राधिकाऱ्याकडील जागांची संख्या (केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया जागा) मंजूर प्रवेश क्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे किंवा (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा) | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण जागा | अल्पसंख्याक कोटा |
| १ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून ) | (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा ) यांच्या १०० टक्के<br>स्वतंत्र तुकडी :- मंजूर प्रवेशक्षमतेच्या १०० टक्के | काही नाही |
| २ | विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा - अल्पसंख्याकासाठीच्या जागा)<br>स्वतंत्र तुकडी :- (मंजूर प्रवेशक्षमता- अल्पसंख्याकासाठीच्या जागा) | किमान ५१ टक्के |

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

डॉ. किरण पाटील
शासनाचे उपसचिव.